**Research Article**

# श्रीसंत चोखामेळा

**हसिना तांबोळी**

बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) , श्रीसंत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

***सारांश*** **:**

नामदेवाच्या संत मंदियाळीतील चोखोबा यांचा कालखंड १३ वे शतक असा निश्चित केला तर आज या घटनेला जवळ जवळ सातशे वर्षे उलटून गेली आहेत. भारतातील मौखिक पंरपरेचा विचार करता चोखोबांच्या व्यक्तीगत जीवनाविषयी थोर देवमाणसे आपल्या व्यक्तीगत जीवनाचा लिखित उल्लेख न करता भगवंतामध्ये एकरुप होऊन त्यांच्याशी संवाद साधण्यामध्येच संपूर्ण आयुष्य घालवून धन्यता मानतात, परंतू आज आमच्यासारख्या सामान्य माणसांना त्यांच्या जीवनपटाचा आढावा घेत असताना येणाऱ्या अडचणी त्या या महानुभावांना कोठे माहित ! असो चोखोबांच्या जीवनासंबंधी खरोखर असेच झाले आहे.

***प्रस्तावना :***

चोखोबा निश्चितपणे महाराष्ट्रातील कोणत्या भागातले, त्यांचा जन्म कोठे झाला, व कधी झाला, त्यांच्या मातापित्याचे नाव काय, त्यांची जीवन जगण्याची कोणती पध्दत होती, उदरनिर्वाहाचे साधन काय होते, ते कायमस्वरुपी मुक्कामी कोठे होते, त्यांच्या कुटूंबातील पाच लोकांच्या व्यतिरिक्त इतर आणखी कोण कोण होते इत्यादी गोष्टीविषयी स्पष्ट पुरावे आज अखेर उपलब्ध नाहीत. चोखोबांच्या जीवनपटाचा अंदाज घेण्यासाठी, त्यांची स्वत:चे अभंग, त्यांच्या समकालीन संतांच्या अभंगातून चोखोबांच्या विषयी झालेला उल्लेख, रुढी व परंपरेने सांगत आलेल्या लोककथा यावरच आज विसंबून रहावे लागते.

नामदेव, जनाबाई, सोयरा, बंका, कर्ममेळा यांनी चोखोबांच्या जीवनाविषयी ज्या थोडयाफार नोंदी केल्या आहेत. त्या पुरेशा नाहीत. म्हणून ज्या नोंदी मिळाल्या तेवढया आधारावरच चोखोबांच्या जीवनपट रंगवावा लागत आहे. परंतू अलीकडे या संदर्भात काही प्रमाणात संशोधन होत असताना दिसते.

**उद्दिष्टे :-**

१. श्री संत चोखामेळा यांच्या साहित्याविषयी माहिती जाणून घेणे.
२. श्री संत चोखामेळा यांची कौटुंबिक जीवनविषयक माहितीचा अभ्यास करणे.
३. श्री संत चोखामेळा साहित्य व तत्कालीन सामाजिक व धार्मिक परिस्थीती यावर प्रकाश टाकणे.

**जीवनपट :-**

चोखोबांच्या जन्मगावाविषयी बरीच संदिग्धता असून संशोधक व अभ्यासकांमध्ये बरीच मतमतांतरे आहेत. आजच्या बुलढाणा जिल्हयातील देऊळगावराजा या तालुक्यातील मेहुणराजा हीच ती मेहुणपुरी, पूर्वी कोरेगांव या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या गावाला नंतर मेहुणपुरी नंतर शके १२६० नंतर मेहुणराजा असे नामकरण झाले. मेहुणराजा हे गाव चोखोबांचे जन्मगावा म्हणून गृहीत धरले तरी खुद्द त्या गावात चोखोबांचे जन्मस्थळ म्हणून तीन वेगवेगळया ठिकाणांचा निर्देश केला जातो. साध्याच्या (१९९८) बौध्दवाडयाच्या पूर्वेला वेशीजवळ महादेवाची पिंड आहे. त्याच्या जवळ असलेले पडझड झालेले ठिकाण म्हणजेच चोखोबांचे जन्मस्थान १९८० साली त्या जागेवर चोखोबांचा मठ बांधण्यात आला.

मेहुणराजामधील २६ मार्च १९५४ च्या दस्तावेज अन्वये, सर्वे क्र. ११५ ई क्लासमधील मंदिराकरिता मिळालेली चार गुंठे जागा आज (१९८८) पंचांच्या मालकीची आहे. काहींच्या मते ही जागा देखील चोखोबांचे जन्म ठिकाण म्हणून ओळखले जाते. मेहुणराजा या गावाचा उल्लेख मेहुणपुरा, मेव्हण या नावाने खुद्द चोखोबांच्या, सोयराबाईंच्या, नामदेवांच्या, एकनाथांच्या अभंगात पहावयास मिळतो.

देव म्हणे नारदाशी। जाय निर्मळा तीर्थासी ।।
तीर्थ निर्मळे संगती। स्थान करी नारदस्वामी ।।
नारदाशी नारदी सरी। धन्य धन्य मेहुणपुरी।।
चोखा म्हणे हेंची देई। स्थान घडो तेये पायी।।

चोखोबांच्या जन्मस्थळासारखेच जन्मकाळाविषयी आज तरी भरीव पुरावे नाहीत, परंतू अलीकडे मेहुणराजा या गावी १४ जानेवारी रोजी चोखोबांच्या जन्मोत्सव साजरा करीत असल्याची नोंद आहे. १४ जानेवारी १९९८ रोजी चोखोबांची ७३० वी जयंती साजरी करण्यात आली. त्या प्रसंगाला अनुसरुन दि. १ फेब्रुवारी १९९८ रोजीच्या दै. लोकमतच्या अंकात प्रा. देवीदास इथापे यांनी लिहिलेल्या प्रासंगिक लेखात चोखोबांच्या जन्म १४ जानेवारी १२६८ रोजी कोरेगांव येथे झाला असे नमूद केले आहे. कदाचित या संदर्भातील पुरावे त्यांच्यापाशी असावेत. तसेच श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने स्थापन केलेल्या संत चोखामेळा समितीने संक्रांत म्हणजे १४ जानेवारी हा चोखोबांचा जन्मदिन मानला आहे, पण त्यास कसलाही आधार नाही.

बंका यांनी चोखोबांची जी आरती लिहिली त्यात चोखोबांच्या जन्मविषयीच्या दोन महत्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख केला आहे. एक म्हणजे, देवाने आंबा चोखीला आणि त्या प्रसादाचे फळ म्हणून चोखोबांचा जन्म झाला. दुसरे म्हणजे, चोखोबांचा जन्म शुध्द एकादशी दिवशी झाला. चोखोबांच्या कौटुंबिक जीवनात प्रामुख्याने सतत पाचच लोकांना उल्लेख होता. स्वतः चोखामेळा, पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहिण निर्मळा आणि मेहुणा बंका, काही नोंदीवरुन चोखोबांच्या आई - वडिलांचे नाव सावित्रीबाई आणि सुदाम येसकर असे आहे. एके ठिकाणी चोखोबांच्या वडिलांचे नाव खंडोबा गाडे असे आहे. डॉ. सौ. पद्मावती श्रोत्रीय संत चोखामेळा आणि परिवार विवेचन अभ्यास या पुस्तकात असे म्हणतात की, चोखोबांची चरित्रात्मक माहिती देणारे काही अभंग पंचरत्नी चोखामेळा अभंगगाथा यामध्ये दिलेले आहे. त्यानुसार चोखोबांच्या वंशवृक्ष मांडून दाखविता येतो तो असा -

| | |
|---|---|
| | राम (गजराबाई) |
| कृष्णा (पत्नी भीमा) | मीराबाई (पत्नी निवृत्ती) |
| ↓ | ↓ |
| बंका (निर्मळा) | चोखोबा (सोयरा), निर्मळा (बंका) |
| सोयरा (चोखोबा) | |
| ↓ | ↓ |
| हरी | कर्ममेळा |

**चोखोबांचे आई - वडिल :-**

चोखोबांच्या माता - पित्याचे नाव, घराणे, याविषयी देखील आज अनेक मत - मतांतरे पुढे येतात. परंपरेने आज असे मानत आले आहेत की, चोखोबांचे वडील सुदाम येसकर व आई सावित्रीबाई येसकर, परंतू देविदास इथापे यांच्या मते तेराव्या शतकातील ग्रामसंख्या म्हणजे परंपरागत गावगाडा पध्दती होती. कोरेगावातील तात्कालीन पाटलाकडे सोळा येसकर म्हणजे कामगार असत. त्यापैकी एक येसकर चोखोबांचे वडिल होती. त्याचा अर्थ येसकर हे चोखोबांचे आडनाव नसून ते व्यवसाय निर्देशक नाव आहे. मेहुणराजा येथील स्वर्गीय राजे बबनराव जाधव यांच्या हस्तलिखित टिपणीनुसार चोखोबांचे पूर्ण नाव चोखोबा खंडोबा गाडे असे आहे. ते मेहुणगावाराजा येथील प्रवेशद्वारावर द्वारपाल म्हणून काम करीत होते. डॉ. पद्मावती श्रोत्रीय आपल्या पुस्तकात अशी नोंद करतात की, मीराबाई व निवृत्ती असे चोखोबांच्या आई - वडिलांचे नाव आहे. इतर काहींच्या मते काकडे घरण्यातील आहेत. पंढरपूर येथील सर्वगोड यांच्या वहितील नोंदीनुसार चोखोबांचे आडनाव कांबळे असे होते.

**जीवन चरित्र :-**

सातशे वर्षांपूर्वीच्या समाजव्यवस्थेचा विचार करता अतिशुद्र जातीत चोखोबांचा जन्म झाला. सोबतीला आराविश्वे दारिद्रय समाजातील उच्चभ्रू वर्गाने त्यांना अत्यंत हिनायमान वागणूक दिल्याच्या पुष्कळशा नोंदी याठिकाणी आहेत. समाजाकडून अनन्वित छळ चोखोबांनी सोसला. हा छळ किती खालच्या स्तराचा होता, त्याची तीव्रता किती होती, याचे स्वतः चोखोबांनी आपल्या अनेक अभंगाद्धारे निरुपन केले आहे.

एका बाजूस भागवत धर्माने त्यांना कवटाळले होते आणि दुसरीकडे हिंदू समाज विटाळ म्हणून त्यांना दूर सारीत होता. हे सर्व सोसूनही भक्तीच्या बळावर त्यांनी संतमंडळीत मानाचे स्थान मिळविले होते. हे जरी खरे असले तरी त्यांच्या मनात सामाजिक दुःखाची सुखरुप सतत होतीच. त्याचेच प्रगटीकरण चोखोबांच्या व त्यांच्या कुटूंबियांच्या अभंगातून झाल्याचे दिसते. हे सर्व अभंग सहृदयतेने वाचत असता आतडयांना पीळ पडतो. यातूनच अत्यंत परखडपणे चोखोबांचे संपूर्ण कुटूंबीयच समाजाला विटाळाचे जाब विचारतात. सोयराबाई म्हणते,

देहासी विटाळी म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ शुध्द बुध्द।।
देहींचा विटाळ देहिंच जन्मला। सोवळा तो झाला कवणधर्म।।
विटाळा वांचोनी उत्पत्तींचे स्थान। कोण देह निर्माण नाही जगी।।
म्हणूनी पांडुरंगा वनितसे थोरी। विटाळ देहांतरी वसतसे।।
देहाचा विटाळ देहीच निर्धारी। म्हणतसे महारी चोखियाची।।

चोखोबांच्या काळात विदयेचा स्पर्श ब्राह्मण समाजाकडेच, सर्व हिंदू देखील यापासून वंचित असताना यातीहिनांची स्थिती पाहून दयनीय होती. विदया नसल्यामुळे तो समजा बहुतेक रानटी लोकांप्रमाणे हलकी कामे करुन व वरच्या समाजाकडून हेटाळणी करुन घेणं हेच त्यावेळी त्यांच्या नशिबी असे.

**चोखोबांचे साहित्य :-**

आज तरी चोखोबांची साहित्यसंपदा संख्यात्मकदृष्टया अगदीच थोडी आहे. ३४९ + ९ अभंगापुरतीच त्यांची काव्यसंपदा सिमीत राहिली. काही ठिकाणी त्यांनी विवेकदीप नावाचा ग्रंथही लिहला होता असा उल्लेख येतो, परंतू आजवर ते शोधण्यासाठी अनेकांनी केलेले प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. चोखोबांची भक्तीची उंची व प्रतिभाशक्ती अगाध होती हे सत्य आरशाइतके स्पष्ट असले तरी त्यांच्या साहित्य रचनेच्या संदर्भात मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात, चोखोबांच्या

कालखंडाला आज सातशे वर्षे उलटून गेली. तेव्हा इतक्या वर्षानंतर चोखोबांच्या विषयी ऐतिहासिक माहिती मिळणे तसे अवघडच आहे. जे पुरावे उपलब्ध होतात ते ऐतिहासिक तत्वावर पारखुनच घ्यावे लागतात. या संदर्भात आजवर जे संशोधन व लेखन झाले ते स्तुत्य असून चोखोबांच्या विविध अभंगावर ऐतिहासिकदृष्टया प्रकाश टाकणारे आहेत. त्यामुळे चोखोबांची माहिती समाजाच्या दृष्टोत्पत्तीस पडली, परंतू एवढे संशोधन व लेखन पुरेसे नाही. तर तरुण संशोधक व लेखक पुढे आले तर चोखोबा आजच्या पेक्षा अधिक उजळून निघतील.

चोखोबांच्या काळच्या समाजरचनेचा विचार करता संस्कृत ही प्रचलित भाषा असून त्यावर मूठभर लोकांचेच वर्चस्व होते. अशा परिस्थितीत हीन कुळात जन्मलेल्या चोखोबांना संस्कृत भाषेतील शिक्षण मिळाले होते का ? हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. तेव्हा त्या काळातील सामाजिक रुढी - परंपरेचा विचार करता चोखोबा निरक्षरच होते याकडेच अधिक कल वळतो. तर मग हीन जातीतला एक निरक्षर, ब्राह्मण वर्गाचा सामाजावर प्रचंड मोठया प्रमाणात पगडा असताना संतश्रेष्ठत्वाच्या पदाला कसा पोहोचला, हा प्रश्न कोणलाही अचंबित करणारा आहे.

अभंग रचनेसाठी चोखोबांनी जशी संतसंगतीतून प्रेरणा मिळाली तशी ज्ञानदेव, नामदेव, गोरा कुंभार, नरहरी सोनार, जनाबाई आदी संतांच्या सोबत अनेकवेळा देशाटन व तीर्थाटन केले त्यापासूनही त्यांनी स्फुर्ती मिळविली. या सर्व घडामोडींचा अंदाज होता त्यांची प्रतिभाशक्ती ही उच्च प्रतीची होती हे निश्चित आणि म्हणूनच चोखोबांनी अगाध ताकदीची अभंगरचना केली.

**मंगळवेढा येथील चोखोबांची समाधी :-**

पंढरपूरच्या दक्षिणेला २१ कि.मी. अंतरावर मंगळवेढा हे गांव त्या गावातील तटबंदी बांधत असताना अचानक ती तटबंदी कोसळली आणि त्या ढिगाऱ्याखाली चोखोबासहित अनेक वेठबिगारी गाडले गेले. त्या जागेवर चोखोबा गतप्राण झाले त्या ठिकाणी बरेच दिवस एक मोठी शिळा रोवून त्या भोवती दगड रचले होते. पुढे त्या ठिकाणी दि. ९ मार्च १९६९ रोजी श्रीमंत राजेसाहेब, सांगली यांनी एक टुमदार घुमटी बांधून ती लोकार्पण केली. परंतू समाधीच्या उद्‌घाटनाची जी निमंत्रण पत्रिका छापली आहे त्यात ९ मार्च १९६१ असे छापले आहे. तारखांच्या या फरकासंबंधी अनेकांकडे विचारणा केली, परंतु समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. पंढरपूर तालुक्यातील तन्हाळी गावचे रत्नाकर महाराज हे मंगळवेढे येथे चोखोबांच्या पुण्यतिथीच्या दरम्यान पोथीवाचन, पारायण, किर्तन यांच्या माध्यमातून सप्ताह साजरा करत असत. त्यांच्या सहवासामध्ये पुढे मंगळवेढयातील कृष्णा रघुनाथ शेंबडे हे विठ्ठल भक्त चोखोबांच्या निर्वाणदिनी म्हणजे वैशाख वदय पंचमीच्या दिवशी कीर्तन, भजनाच्या माध्यमातून पुण्यतिथी साजरी करीत असत. आज त्यांचे वंशज श्री. जयराज शेंबडे व इतर नातेवाईकांनी ही परंपरा तशीच चालू ठेवली असून गेल्या पाच वर्षापासून ते श्री संत चोखामेळा यांच्या नावाने एक राज्यस्तरीय पुरस्कारही प्रदान करीत आहेत.

**मंगळवेढयातील विसावा :-**

पंढरपूर - मंगळवेढा या रस्त्यावर दोन ठिकाणी (मंगळवेढयापासून दीड कि.मी. अंतरावर एक आणि १७ कि.मी. अंतरावर एक) विसाव्याच्या स्मृतीखुणा आहेत. त्या ठिकाणी समाधीवजा दगडी चौफाळा बांधून त्यावर पादुका व छोटीशी ईश्वराची पिंडीची स्थापना केली आहे. ही दोन्ही ठिकाणे विसावे म्हणून ओळखले जातात. पंढरपूर नजीकच्या विसाव्याच्या चौफाळयाभोवती १९८०-९५ च्या दरम्यान चार मोठी लिंबाची झाड होती, परंतु आज एकच झाड शिल्लक राहिले आहे. चोखोबांच्या आकस्मिक मरणानंतर त्यांच्या अस्थी गोळा करुन नामदेवांनी मंगळवेढयावरुन पंढरपुरी जात असताना या ठिकाणी विसावा घेतल्याचे लोकमानसातील ऐकिव आहे. चोखोबा मंगळवेढयावरुन पंढरपुरास विठ्ठलाच्या दर्शनास जाता येता या ठिकाणी विश्रांती घत असत असेही म्हणतात. मंगळवेढयातील संत कान्होपात्रा हिच्यावर ज्यावेळी अतीसंकट ओढून आले तेंव्हा यातून सुटका करुन घेण्यासाठी पंढरपूराकडे निघालेल्या एक दिंडीच्या गर्दीत सामील होऊन तिने पंढरपूर गाठले. त्यावेळी तिने या ठिकाणी काही क्षण विसावा घेतला, असेही काहींचे मत, विशेष म्हणजे बिदरच्या बादशहाने दामाजीपंताना

कैद करुन बिदरला आणण्यासाठी ज्यावेळी हुकूम झाला त्यावेळी त्यांनी विठ्ठलाचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार दामाजीपंतांना मंगळवेढयावरुन पंढरपूरला नेत असताना याठिकाणी थोडा विसावा होऊन पुढे गेल्याचे काही जाणकारांचे मत आहे. असा हा तो विसावा. या वाटेवरुन जाणाऱ्या दिंडया हमखास या ठिकाणी थांबून अभंग म्हणूनच पुढे सरकतात.

**निष्कर्ष :-**

श्री संत चोखामेळा यांनी त्यांच्या साहित्याद्वारे समाजातील दुर्बल प्रथांवर प्रकाश पाडून तो संपविण्याच्या दृष्टीने यथायोग्य प्रयोग केले. श्री संत चोखामेळा कष्टकरी असताना देखील पांडुरंगावरील त्यांची भक्ती व त्यासाठी त्यांची असणारी तळमळ या अभंगातून दिसून येते. आजही श्री संत चोखामेळा चे कार्य व त्यांचे साहित्य सर्व समाजातील लोकांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे त्यावर अधिक प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ :-**

१) *घार्गे वसंत रामचंद्र, संत चोखामेळा एक ऐतिहासिक अभ्यास, अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९७९.*
२) *गोसावी र.रा. श्री.संत सकलगाथा, सारथी प्रकाशन, पुणे, २०००.*
३) *अत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, आर्यभूषण छापखाना, पुणे, १९१५.*
४) *बहिरट भा.प. व भालेराव प्र.ज्ञा., वारकरी सांप्रदायाचा उदय व विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७२.*
५) *मुंजळ वा.ल. संत चोखामेळा विविध दर्शन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१.*
६) *Maharashtra State Gazetter Solapur District, 1989.*
७) *कदम.एस.बी., संत चोखामेळा महाराज चरित्र व अभंगगाथा.*



**हसिना तांबोळी**
बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) , श्रीसंत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.